पश्चिम विदर्भातील सर्वाधिक अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अमरावती

● वर्ष १ ● अंक ७९ ● बुधवार, दि. १२ ऑगस्ट २०२६ ●मूल्य ३ ● पृष्ठे ४

RNI No.- MHAR/ 26 / A2977 Postal Regn. No. AKL DN /283 / 2024-2026 Web.http://epaper.citynewssuperfast.com

**सुविचार**

माणसं जोडणं सोपं असतं, पण ती टिकवणं ही एक कला आहे.




## »थोडक्यात

### आता मराठी येत नसल्यास चालकाचे लायसन्स होणार रद्द !

**मुंबई :** मुंबईसह महाराष्ट्रात आता रिक्षा आणि टॅक्सी चालकाला मराठी येत नसल्यास त्याचे लायसन्स रद्द करण्यात येणार आहे. आजच या संदर्भात शासन निर्णय जाहीर होणार असल्याची माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली. मोटर व्हेहिकल अॅक्ट १९८८ मध्ये बदल करून मोटर अमेंडमेंट रूल्स २०२६ आजपासून लागू होणार आहे.

सदर नवीन नियमाप्रमाणे जर रिक्षा किंवा टॅक्सी चालकाला मराठी भाषेचे व्यवहारिक ज्ञान नसेल, जुजबी मराठी देखील बोलता येत नसेल तर त्याला आधीच एका महिन्याची नोटीस देण्यात येईल. त्या एका महिन्यात देखील चालकाने मराठी शिकली नाही, तर त्याचे लायसन्स ३ महिन्याच्या कालावधीसाठी रद्द करण्यात येणार आहे. यानंतर देखील चालक मराठी शिकत नसेल तर त्याचे लायसन्स कायमस्वरूपी रद्द करण्याची तरदूत या कायद्यामध्ये असणार आहे. आजच हा नवीन कायदा लागू केला जाणार आहे.

---

### मुलांना जीवनसाथी निवडण्याचे स्वातंत्र्य': मुंबई उच्च न्यायालय

**मुंबई:** सज्ञान मुले ही स्वतंत्र व्यक्ती असतात, ती आई-वडिलांची मालमत्ता नाहीत, असे मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने एका महत्त्वपूर्ण निकालात स्पष्ट केले. जर एखाद्या सज्ञान मुलीला स्वतःच्या इच्छेने एखाद्या तरूणासोबत राहायचे असेल, तर तिच्या ताब्यासाठी 'हेबिअस कॉर्पस' याचिका दाखल केली जाऊ शकत नाही, असे न्यायालय म्हणाले. आपल्या पसंतीच्या पुरुषासोबत राहण्याचा निर्णय घेतलेल्या सज्ञान मुलीचा ताबा मिळवण्यासाठी तिच्या आईने दाखल केलेली याचिका फेटाळून लावताना न्यायालयाने हा निकाल दिला. नागपूरमधील एक मुलगी वयाच्या १७ व्या वर्षी क्लासला जाण्याच्या बहाण्याने घर सोडून गेली होती. नंतर सीसीटीव्ही फुटेजमध्ये ती एका तरुणासोबत जाताना दिसली. पोलिसांनी तिचा शोध घेऊन तिला तिच्या आईच्या स्वाधीन केले, परंतु काही काळानंतर ती पुन्हा घर सोडून गेली.

# मी संसदेत कोणत्याही प्रश्नांची उत्तरे देण्यास तयार- गृहमंत्री अमित शहा

## पहिल्यांदाच मांडली भूमिकी; लेक्चर ऐकण्यात विरोधकांना रस नाही- राहुल गांधी

वृत्तसंस्था १२ ऑगस्ट

**नवी दिल्ली :** बेपत्ता, पळून गेले, फरारी अशी भाषा आता सार्वजनिक जीवनात आणि संसदीय जीवनात ऐकू येत आहे, संसदेचे अधिवेशन सुरू झाल्यापासून, मी नियमितपणे संसदेत उपस्थित राहत आहे आणि माझ्या दालनात बसत आहे. विरोधी पक्ष दोन्ही सभागृहांमध्ये संसदेचे कामकाज रोखत असल्यामुळे, कोणी काय करू शकेल? असे केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी म्हटलं आहे. अमित शाह म्हणाले की, चर्चेबद्दल बोलायचे झाल्यास, सरकारतर्फे आमचे संसदीय कामकाज मंत्री, किरेन रिजिजू यांनी हे अगदी स्पष्ट केले आहे की, नीट आंदोलनादरम्यान झालेल्या विद्यार्थी आंदोलनाच्या सर्व पैलूंवर चर्चा करण्यास सरकार तयार आहे. त्यांनी चर्चेसाठी वेळ द्यावा आणि विरोधी पक्षाने तयार राहावे, असा आग्रह धरला. सुरुवातीला त्यांची हीच मागणी होती आणि आम्ही ती मान्य केली. मी हेही सांगितले आहे की, मी संसदेत कोणत्याही प्रश्नांची उत्तरे देण्यास तयार आहे. पण त्यांना कोणतीही चर्चा होऊ द्यायची नाही.

दरम्यान, राहुल गांधी यांनी अमित शाह यांच्या भूमिकेवरून पलटवार केला आहे. ते म्हणाले, 'विरोधी पक्षाने स्पष्टपणे सांगितले आहे



की, अमित शाह यांनी आम्हाला उपदेश करावा, यात आम्हाला कोणताही रस नाही. जेव्हा मी 'आम्ही' असे म्हणतो, तेव्हा माझा उद्देश देशातील तरुण पिढी असा असतो. विद्यार्थ्यांनीवर गोळ्या कोणी चालवल्या? खिळे लावलेल्या लाठ्यांनी विद्यार्थ्यांना मारहाण करण्याचे आदेश कोणी दिले? आमच्या मुलांवर गोळ्या झाडण्याचे आदेश अमित शाह यांनी दिले होते का? जर त्यांनी तसे केले असेल, तर त्यांनी राजीनामा दिला पाहिजे. गेल्या २० दिवसांपासून अमित शाह बेपत्ता आहेत. भारताच्या गृहमंत्र्यांमध्ये हिंमत नाही; ते सभागृहात येऊ शकत नाहीत.

### आम्ही प्रश्नोत्तराचा तास स्थगित करण्यासही तयार

ते म्हणाले की, संसदेत चर्चेसाठी नियम आणि कार्यपद्धती आहेत. आता, जर कोणी मला सांगितले की, 'तुम्ही निवेदन केले पाहिजे,' तर अशा गंभीर विषयावर अशाप्रकारे चर्चा होऊ शकत नाही. कदाचित तुमच्या पद्धतीत हे असेल, पण ही संसदीय पद्धत नाही. संसदेत सविस्तर चर्चा होतात. आज दुपारी ३ वाजल्यापासून रात्री उशिरापर्यंत, जोपर्यंत ते बसतात, आणि उद्या दुपारी ३ वाजेपर्यंत. अध्यक्षांनी परवानगी दिल्यास आम्ही प्रश्नोत्तराचा तास स्थगित करण्यासही तयार आहोत. मी उद्या दुपारी ३ वाजेपर्यंत चर्चेसाठी तयार आहे. मी स्वतः बसेन, सर्व काही लिहून घेईन आणि प्रत्येक प्रश्नाचे उत्तर देईन, जेणेकरून देशातील जनतेला सर्व काही स्पष्ट होईल, अगदी पाण्यासारखे. आता विरोधकांनी ठरवायचे आहे की चर्चा करायची की गोंधळ घालायचा, असे त्यांनी सांगितले.

# राज ठाकरेंनी घेतली मुख्यमंत्री फडणवीसांची भेट!

## वर्षा निवासस्थानी दोन्ही नेत्यांमध्ये चर्चा

प्रतिनिधी १२ ऑगस्ट

**मुंबई :** मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची वर्षा या त्यांच्या निवासस्थानी जाऊन भेट घेतली. कोकणातले रस्ते, शिवाजी पार्क मैदानाचा विषय याबाबत त्यांची चर्चा झाल्याची माहिती समोर आली आहे. राज ठाकरे यांनी मुंबई गोवा महामार्गाच्या प्रश्नावर आक्रमक भूमिका घेतली होती.

९ ऑगस्टला झालेल्या पत्रकार परिषदेत त्यांनी मुंबई-गोवा महामार्गावरुन सरकारवर टीका केली होती. त्यानंतर तीन दिवसांतच ही भेट झाली आहे. ज्यावरुन आता विविध चर्चा होत आहेत. १७ वर्षे मुंबई-गोवा महामार्गाचे काम रखडले असून त्याचा कोकणवासीयांना प्रचंड मनस्ताप सहन करावा लागत आहे. यामध्ये माणगाव बायपासचे रखडलेले काम मोठा अडसर ठरत आहे. याच कामाची राज ठाकरे यांनी पाहणी केली होती. तसंच पत्रकार परिषद घेऊन राजकीय हस्तपेक्षामुळे मुंबई-गोवा महामार्ग रखडला, असं राज ठाकरे यांनी सांगितलं होतं. आमच्या जमिनी, आमचं पाणी आणि यावर बाहेरचे लोक पोसले जाणार आहेत. कोकणात आपल्या पायाखालच्या जमिनी खेचल्या जात आहेत आणि त्यामुळे असं वाटतंय की आता विकासच नको. १५ वर्षांपासून तीच गोष्ट सुरू आहे. तेच खड्डे, तोच ट्रॉफिक जाम, आपल्याकडे निवडणुकीत तेच तेच विषय असतात. नोकरी, पाणी, रस्ते असंही राज ठाकरे म्हणाले होते. तसंच सगळे आमदार एकत्र आले असते तर इतकी वर्षे लागली नसती असंही राज ठाकरेंनी म्हटलं होतं. यानंतर त्यांनी वर्षा या मुख्यमंत्र्यांच्या निवासस्थानी जाऊन देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. या भेटीचा तपशील समजला नसला तरीही सूत्रांच्या माहितीनुसार याच विषयांवर दोन्ही नेत्यांमध्ये चर्चा झाल्याची माहिती आहे.

# 82 वर्षीय दाम्पत्याची 'डिजिटल अरेस्ट'मधून सुटका; सायबर पोलिसांची कारवाई!

प्रतिनिधी १२ ऑगस्ट

**अमरावती :** शहरातील एका ज्येष्ठ दाम्पत्याला पोलिस असल्याची बतावणी करून तुमच्या नावे नाशिकमध्ये बनावट खाते उघडून त्यातील पैशांचा मनि लॉड्रींग व इतर देशविरोध कारवायांसाठी उपयोग करण्यात येत आहे, असे सांगितले. यातून वाचण्यासाठी आम्ही जे सांगतो ते करा, असे म्हणून त्यांचे बँक खाते, व इतर मुद्देमालांची माहिती घेतली. वेळी अमरावती सायबर पोलिसांनी दखल घेतल्याने या दाम्पत्याची डिजिटल अरेस्टमधून सुटका झाली. तसेच आर्थिक फसवणूकही टळली आहे. सायबर पोलीस स्टेशन, अमरावती शहर यांना मोबाईल फोनवर ११ ऑगस्ट रोजी माहिती मिळाली की, शिवछाया कॉलनी, शंकर नगर, अमरावती येथील ८२ वर्ष वयाचे ज्येष्ठ नागरिक विजय डाखोडे यांना कोणीतरी पोलीस असल्याची बतावणी करुन, विजय डाखोडे यांच्या नावाने कॅनेरा बँक, नाशिक येथे बँक खाते उघडण्यात आले. त्या खात्याचा उपयोग मनि लॉड्रींग, सायबर फसवणूक व इतर देशविरोधी बेकायदेशीर कृत्ये करण्याकरीता करण्यात आल्याने त्याचा तपास करण्याकरिता तुम्हाला अटक करावी लागेल, असे सांगितले. विजय डाखोडे यांना १० ऑगस्ट रोजी अंदाजे ६ वाजता अज्ञात मोबाईल क्रमांकावरुन कॉल आला होता व आम्ही पोलीस असून तुमच्या बँक खात्याची तसेच तुमची चौकशी करावयाची आहे. तसेच सदर कृत्य हे देशविरोधी असल्याने याबाबत कुठेही वाच्यता करु नये अन्यथा तुम्हाला अटक करावी लागेल, असे म्हटले. सदर प्रकारामुळे व याप्रकारची बतावणी केल्यामुळे विजय डाखोडे घाबरुन जाऊन पोलिसांना सहकार्य करण्याची सहमती दर्शवीली. त्यांनी सांगितल्याप्रमाणे डाखोडे यांच्याकडे असलेले सर्व बँक खाती, मौल्यवान दागिने, बँक एफडी व इतर गुंतवणुकीची संपूर्ण माहिती तपशिलवारपणे सांगितली असता सदर गुन्हयातून सुटका करावयाची असल्यास आम्ही सांगितल्याप्रमाणे वागावे लागेल व तपास पूर्ण होईपर्यत सर्व जमा रक्कम विशिष्ट बँक खात्यामध्ये पाठवावी लागेल, असे सांगितले. तसेच त्यांना दर दोन तासांनी 'आय अॅम सेफ' असा संदेश पाठविण्यास सांगितले. आम्ही सांगितल्याप्रमाणे तुम्ही वागले नाही तर आमची तुमच्यावर पाळत असुन काही चुकीचे करण्याचा प्रयत्न केल्यास तात्काळ अटक करण्यात येईल, असे व्हिडीओ कॉलवर बजावत होते. पैसे पाठवावे लागतील असे सांगीतल्यावरुन डाखोडे यांना शंका आल्याने त्यांच्या पत्नी जयश्री विजय डाखोडे यांनी त्यांचे जावई मंगेश देशमुखांना कॉल करुन माहिती देण्यास सांगितले व मंगेश देखमुखांनी तात्काळ सायबर पोलीस स्टेशन, अमरावती शहरचे पोहेकों निखील माहुरे यांना संपर्क करुन सदर प्रकाराची माहिती दिली.

# गोवंश तस्करीवर वनविभागाची धाडसी कारवाई; 6 बैल जप्त!

प्रतिनिधी १२ ऑगस्ट

**हिवरखेड :** मेळघाट व्याघ्र प्रकल्पांतर्गत अकोट वन्यजीव विभागाच्या वान वनपरिक्षेत्र कार्यालयाने ११ ऑगस्ट रोजी रात्री साडेसातच्या सुमारास दक्षिण नागरतास बिटातील वनखंड क्रमांक १२६१ मध्ये कारवाई करत ६ बैलांची अवैध वाहतूक उघडकीस आणली. गोपनीय माहितीच्या आधारे वनपरिक्षेत्र अधिकारी एस. ए. आंबेकर व त्यांच्या पथकाने ही कारवाई केली.या प्रकरणी भारतीय वन अधिनियम १९२७ आणि वन्यजीव संरक्षण अधिनियमाच्या



विविध कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून जप्त केलेले बैल ताब्यात घेण्यात आले आहेत. आरोपी अंधाराचा फायदा घेऊन फरार झाले असून वनविभाग त्यांचा शोध घेत आहे. ही कारवाई उपवनसंरक्षक आर. एस. टोलीया व साहाय्यक वनसंरक्षक जी. पी. टेकाळे यांच्या मार्गदर्शनाखाली वनपाल आर. के. तायडे, वनरक्षक प्रमिला जावरकर, अर्पिता कास्देकर व पथकाने केली. व्याघ्र प्रकल्पात अवैध प्रवेश, वनचराई व गोवंश तस्करीस सक्त मनाई असून उल्लंघन केल्यास ७ वर्षांपर्यंतच्या शिक्षेची तरतूद आहे. जंगलात संशयास्पद हालचाली दिसल्यास १९२६ या टोल फ्री क्रमांकावर माहिती देण्याचे आवाहन वनविभागाने केले आहे.

# जिल्हा पुनर्वसन विभागात दलाल झाले सक्रिय

## कृषी विद्यापीठात बोगस प्रकल्पग्रस्तांच्या भरतीचा आरोप

प्रतिनिधी १२ ऑगस्ट

**अकोला :** डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ प्रशासनाने तयार केलेल्या ४५१ कर्मचाऱ्यांच्या प्रकल्पग्रस्त यादीची सखोल चौकशी करण्यात यावी आणि जिल्हा पुनर्वसन अधिकाऱ्यांनी पदभरतीमध्ये केलेल्या घोटाळ्यावर कडक कारवाई करण्यात यावी, अशी मागणी एका निवेदनाद्वारे आज करण्यात आली आहे. दरम्यान,पुनर्वसन विभागात सक्रिय दलालांची चौकशीची मागणी होत आहे. या विषयी जिल्हा पूनर्वसन अधिकाऱ्यांना आमचे प्रतिनिधी भेटल्यावर त्यांनी तुम्हाला जे छापायचे



ते छापा असे म्हणत हात वर केले. इतकेच नाही तर ते रुजू झाल्यापासून त्यांनी केवळ ४ लोकांना प्रमाणपत्रे दिल्याचा दावा केला आहे. महाराष्ट्र शासनाच्या कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागाच्या शासन निर्णयानुसार विद्यापीठाच्या अस्थापनेवर प्रकल्पग्रस्तांमधून पदे भरताना विशेष भरती मोहीम राबवण्यास मान्यता देण्यात आली होती. मात्र, यात नियमांची पायमल्ली झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. प्रकल्पग्रस्त दाखला हा केवळ संबंधित व्यक्ती किंवा तिच्या कुटुंबातील एकाच व्यक्तीला वापरता येतो. असे असतानाही, जिल्हा पुनर्वसन अधिकारी आणि कुलसचिव यांनी कायद्याचे पालन न करता अपात्र किंवा बोगस उमेदवारांना नोकरीत सामावून घेतल्याचा आरोप प्रकल्पग्रस्तांनी केला आहे. प्रकल्पग्रस्तांची निवड झाल्यानंतर त्याबाबतचा तपशील तातडीने जिल्हाधिकारी कार्यालयात कळवणे आवश्यक असताना, विद्यापीठ प्रशासन आणि पुनर्वसन अधिकाऱ्यांनी हेतुपुरस्सर हा तपशील लपवून ठेवल्याचे तक्रारीत नमूद केले आहे. याप्रकरणी संबंधित अधिकाऱ्यांवर त्वरित चौकशी करून दोषींवर कायदेशीर कारवाई करण्याची आणि खऱ्या प्रकल्पग्रस्तांना न्याय देण्याची मागणी केली आहे.

# जशाच तसे उत्तर देऊ - पवन महल्ले

## सागर भारुका यांच्या आरोपांविरोधात शहर सुधार आघाडी आक्रमक

प्रतिनिधी १२ ऑगस्ट

**अकोला:** अकोला महानगरपालिकेत सत्ताधारी गटातील वाद पुन्हा एकदा चव्हाट्यावर आला आहे. आमसभेच्या बैठकीत शिवसेना (शिंदे गट) नगरसेवक सागर भारुका यांनी उपस्थित केलेल्या मुद्द्यांवरून आणि केलेल्या आरोपांवरून महापालिकेत जोरदार वाद निर्माण झाला. या घटनेनंतर शहर सुधार आघाडी आणि समर्थकांनी महापालिकेसमोर एकवटून सागर भारुका यांच्या भूमिकेचा कडक शब्दांत निषेध केला.

आज दूपारी महापालिका परिसरातील निदर्शनादरम्यान प्रतिनिधींनी सागर भारुका यांच्या कारभारावर आणि वक्तव्यांवर कडाडून टीका केली. सागर भारुका कुठल्याही पुराव्याशिवाय प्रशासनावर



आणि पदाधिकाऱ्यांवर बिनबुडाचे आरोप करत आहेत. जर त्यांच्याकडे कुठले पुरावे नसतील, तर त्यांनी अशी बाष्कळ विधाने करणे बंद करावे, असा इशारा भाजप सभागृह नेता पवन महल्ले यांनी दिला आहे.

भारुका ज्या भाषेत बोलतील, त्यांना त्याच भाषेत उत्तर दिले जाईल. शहरात नौटंकी आणि तमाशा करून महापालिकेचे वातावरण बिघडवण्याचे काम चालणार नाही. आम्ही जशाच तसे उत्तर देऊ असा इशारा पवन महल्ले यांनी दिला.

शहरात चांगले काम चालू असताना, देशभक्त, स्वातंत्र्य सैनिक आणि सैनिकांच्या मुद्द्यांवरून किंवा उपक्रमांवरून भलतेच राजकारण केले जात आहे. शहरात आणि महापालिकेत शांतता राखायची असेल तर लोकशाही मार्गाने आणि शांततेने आपले मुद्दे मांडावेत. दादागिरी आणि तमाशा सुरू राहिल्यास शहर सुधार आघाडी त्यांना त्यांची जागा दाखवल्याशिवाय राहणार नाही. निदर्शनादरम्यान 'दादागिरी नाही चलेगी' आणि 'विजय अग्रवाल आगे बढो, हम तुम्हारे साथ है' अशा जोरदार घोषणाबाजीने महापालिका परिसर दुमदुमून गेला होता. या वादामुळे अकोल्यातील राजकारण चांगलेच तापले आहे.



# आमदार रणधीर सावरकर यांच्या पाठपुराव्याला यश

## कृषी विद्यापीठ प्रकल्पग्रस्तांसाठी समिती गठित

प्रतिनिधी १२ ऑगस्ट

**मुंबई :** आमदार तथा डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाच्या कार्यकारी परिषद सदस्य रणधीर सावरकर यांच्या सविस्तर पाठपुराव्यामुळे मंत्रालयात दोन महत्त्वाच्या बैठका पार पडल्या. कृषी शिक्षणाचा दर्जा वाढवणे आणि प्रकल्पग्रस्तांना न्याय मिळवून देणे या दोन्ही विषयांवर सकारात्मक निर्णय झाले. महाराष्ट्र राज्य कृषी शिक्षण व संशोधन परिषदेकडून शासनास सादर करण्यात आलेला राज्यातील कृषी विद्यापीठांसाठीचा प्रस्तावित मसुदा सेवा प्रवेश नियम, २०२६ हा परिपूर्ण अभ्यास न करता तसेच संकुचित विचारसरणीतून तयार करण्यात आला आहे. त्यामुळे या नियमांवर अंतिम निर्णय घेण्यापूर्वी सर्व संबंधितांशी सांगोपांग चर्चा



करूनच निर्णय घ्यावा, अशी मागणी आमदार सावरकर यांनी कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांना दिलेल्या सविस्तर पत्राद्वारे केली होती. या मागणीची दखल घेत कृषीमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात बैठक झाली.

बैठकीत आमदार सावरकर यांनी स्पष्ट केले की, 'सेवा प्रवेश नियम' हे महाराष्ट्र कृषी विद्यापीठ अधिनियम, १९८३ तसेच त्याअंतर्गत तयार करण्यात आलेल्या परिनियम, १९९० (सुधारणा २०१४ व २०२३) यांच्या अधीन असलेले गौण नियम आहेत. त्यामुळे सेवा प्रवेश नियमांद्वारे मूळ अधिनियम अथवा परिनियमांशी विसंगत तरतुदी करता येणार नाहीत. कर्नाटक व तामिळनाडू राज्यांतील कृषी विद्यापीठे तसेच महाराष्ट्रातील चारही कृषी विद्यापीठांचे प्रतिनिधी यांचा समावेश असलेली राष्ट्रीय स्तरावरील उच्चस्तरीय तज्ज्ञ समिती गठित करण्यात यावी, अशी सूचना आमदार सावरकर यांनी केली. या समितीने तुलनात्मक अभ्यास करूनच अंतिम नियम तयार करावेत, जेणेकरून कायदेशीर व शैक्षणिक दृष्ट्या परिपक्व कायदा तयार होईल.

# अकोट शहर पोलिसांची धडक कारवाई 235 किलो गोमांस जप्त, चार जण ताब्यात

वि. प्रतिनिधी १२ ऑगस्ट

**अकोट :** अकोट शहर पोलिसांनी कुरेशीपुरा परिसरात धाड टाकून गोवंश जातीच्या जनावरांची अवैध कत्तल करून मांस विक्री करणाऱ्या चार जणांना ताब्यात घेतले. या कारवाईत अंदाजे २३५ किलो गोवंश जातीचे मांस जप्त करण्यात आले असून त्याची किंमत सुमारे ४७ हजार रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले.

डी.बी. पथकाचे प्रमुख पोलीस उपनिरीक्षक निलेश बारहाते यांना मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार, कुरेशीपुरा येथील एका घरात गोवंश जनावरांची कत्तल करून मांस विक्री सुरू असल्याची माहिती मिळाली होती. त्यानुसार पोलीस निरीक्षक किशोर जुनघरे यांच्या मार्गदर्शनाखाली



पोलिसांनी पंचांसह छापा टाकला.

कारवाईदरम्यान शे,इमरान शे, इस्माईल (३४), जमिल अहमद अब्दल हमीद (५५), शाहरुख खान हिरेखान (३४) आणि शे, मुकद्दर अब्दुल सत्तार कुरेशी (६१), सर्व रा. कुरेशीपुरा, अकोट हे गोवंश जातीच्या जनावराचे मांस विक्रीसाठी तयार करताना आढळून आले.

पोलिसांनी घटनास्थळावरून २३५ किलो मांस जप्त करून संबंधितांविरुद्ध गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, अपर पोलीस अधीक्षक बी. चंद्रकांत रेड्डी आणि उपविभागीय पोलीस अधिकारी निखिल पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक किशोर जुनघरे, पोउनि निलेश बारहाते तसेच डी.बी. पथकातील कर्मचाऱ्यांनी केली.

# शरद पवारांच्या विचारांवर, शशिकांत शिंदेंच्या मार्गदर्शनाखाली अकोल्यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची ताकद वाढविण्याचा निर्धार

प्रतिनिधी १ २ऑगस्ट

**अकोला :** राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष – शरदचंद्र पवार, अकोला महानगरच्या वतीने नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचा सत्कार समारंभ मंगळवारी सर्किट हाऊस, अकोला येथे उत्साहात पार पडला. यावेळी नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करून त्यांना पुढील राजकीय व सामाजिक वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

पक्षाचे प्रदेश कार्याध्यक्ष रोहितदादा पवार यांच्या हस्ते नियुक्त करण्यात आलेले अकोला महानगर युवा अध्यक्ष देवानंद राऊत, अकोला पश्चिम अध्यक्ष फिरोज खान आणि अकोला महानगर महासचिव शेख ऐनुलहक कुरेशी यांचा यावेळी सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रदेश उपाध्यक्ष श्याम अवस्थी होते. यावेळी महानगर अध्यक्ष रफीक सिद्दीकी, कार्याध्यक्ष देवानंद ताले यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी प्रदेश संघटक सचिव जावेद जकरिया, महिला अध्यक्ष, विधी सेलचे अध्यक्ष, अपंग सेलचे अध्यक्ष सालार भाई, नजमाताई, लक्ष्मीताई, बोरकरताई, शैलेश बोधडे, ॲड. संदीप तायडे, बाबा घुमरे तसेच पक्षाचे वरिष्ठ नेते

## नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचा सत्कार पदाधिकारी व कार्यकर्त्यांची उपस्थिती




काजी साहेब यांच्यासह पक्षाचे विविध पदाधिकारी, कार्यकर्ते आणि हितचिंतक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष. शरदचंद्रजी पवार यांच्या पुरोगामी विचारांना पुढे नेत तसेच महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली अकोला महानगरात पक्ष संघटना अधिक मजबूत करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला. शरद पवार यांच्या नेतृत्वाखाली पक्षाने सर्वसामान्य नागरिक, शेतकरी, कामगार, युवक, महिला आणि वंचित घटकांच्या प्रश्नांना सातत्याने प्राधान्य दिले आहे. त्याच विचारधारेवर अकोला महानगरात पक्षाचे संघटन अधिक व्यापक करण्यावर भर देण्यात येणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.नवनियुक्त पदाधिकाऱ्यांमुळे अकोला महानगरातील पक्ष संघटनेला नवी ऊर्जा मिळाली असून, देवानंद राऊत, फिरोज खान आणि शेख ऐनुलहक कुरेशी यांच्या माध्यमातून युवक, अकोला पश्चिम आणि महानगर संघटनेला अधिक गतिमान करण्याचा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला. कार्यक्रमास मोहम्मद उमर फारूक, हुसैन खान सुलतान खान, सैयद मोहसिन, फिरोज भाई, सैयद रिजवान, याया पठाण, आकाश बुंदेले, शैलेश गजभिये, रूबिन मोहोजम, फजलहक कुरेशी, शेख ऐनुलहक कुरेशी, साकिब अहमद, अयाज कुरेशी, मोहम्मद मुजाहिद, कार्तिक देशमुख, वेद ठाकरे, संकेत चोपडे, नितेश बोराखडे, प्रदीप मस्तूद यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते व हितचिंतक मोठ्या संख्येने उपस्थित होते. नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना शुभेच्छा दिल्या.

# अकोल्याच्या ऐश्वर्याचे शिष्यवृत्ती परीक्षेत घवघवीत यश



प्रतिनिधी १२ ऑगस्ट

**- जिल्ह्यात अव्वल स्थान पटकावून वाढवला शाळेचा मान**
**- ढोल-ताशांच्या गजरात मिरवणूक आणि जंगी सत्कार**

**अकोला :** मेहनत, चिकाटी आणि अभ्यासातील सातत्य यांच्या जोरावर अकोल्याच्या विद्यार्थिनीने यशोशिखर गाठले आहे. महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्या वतीने घेण्यात आलेल्या सन २०२५-२६ मधील शिष्यवृत्ती परीक्षेत 'मांगीलालजी शर्मा विद्यालया'तील इयत्ता ७ वीची विद्यार्थिनी ऐश्वर्या जगदीश साळुंखे हिने ९०.६० टक्के गुण मिळवत जिल्ह्यात प्रथम येण्याचा बहुमान मिळवला आहे.

ऐश्वर्या साळंखे हिच्या या गगनभरारीने केवळ तिचे कुटुंबच नव्हे, तर संपूर्ण मांगीलालजी शर्मा शाळा आणि डाबकी रोड परिसर अभिमानाने उजळून निघाला आहे. याच परीक्षेत शाळेतील अभिनंदन प्रशांत नवथळे या विद्यार्थ्याने देखील चमकदार कामगिरी करत जिल्ह्यात १६ वा क्रमांक पटकावला आहे. विद्यार्थ्यांच्या या अद्वितीय यशाचे कौतुक करण्यासाठी मांगीलालजी शर्मा विद्यालयात भव्य आनंदोत्सव साजरा करण्यात आला. संपूर्ण शाळा परिसर ढोल-ताशांच्या गजराने आणि गुलालाच्या उधळणीने दुमदुमून गेला होता. याप्रसंगी आयोजित विशेष कार्यक्रमात संस्थेचे अध्यक्ष संजय वानखडे, संचालिका अर्चनाताई शर्मा, सिद्धेश कृष्णाजी शर्मा, देवाशिष कृष्णाजी शर्मा, सचिव रमणजी पाटील आणि संचालक भानुदासजी यन्नावार यांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थ्यांचा शाल, श्रीफळ व भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला. सत्कारानंतर दोन्ही यशस्वी विद्यार्थ्यांची ढोल-ताशांच्या तालावर शाळा परिसरातून मिरवणूक काढण्यात आली. आपल्या विद्यार्थ्यांच्या या दैदिप्यमान यशावर बोलताना संस्थाचालक, मुख्याध्यापिका व शिक्षकांचे डोळे कौतुकाने भरून आले होते. यशामध्ये मुख्याध्यापिका वंदना हरिहरराव देशमुख, प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक सुभाष खुळे, प्रभारी गोपाल मोरे आणि ज्येष्ठ शिक्षक धर्मेंद्र श्रीवास्तव यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

# नागरी समस्या तातडीने सोडवा; शिक्षण सभापती सरिता पाटील यांचे नगरपरिषदेला निवेदन

प्रतिनिधी १२ ऑगस्ट

**मूर्तिजापूर :** शहरातील मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त, डासांचा वाढता प्रादुर्भाव आणि उद्याने-खुल्या जागांच्या देखभालीबाबत मूर्तिजापूर नगरपरिषदेच्या शिक्षण सभापती सरिता राहुल पाटील यांनी ११ ऑगस्ट रोजी मुख्याधिकारी जाधव व नगराध्यक्ष हर्षल साबळे यांना निवेदन सादर केले.

निवेदनात नमूद केल्यानुसार, शहरात मोकाट कुत्र्यांच्या सुळसुळाटामुळे लहान मुले, महिला, ज्येष्ठ नागरिक व दुचाकीस्वारांमध्ये भीतीचे वातावरण आहे. तसेच पावसाळ्यामुळे नाल्या व साचलेल्या पाण्यावर डासांची उत्पत्ती वाढून आजारांचा धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे तातडीने औषध व धूर फवारणी (फॉगिंग) करण्याची मागणी करण्यात आली. याशिवाय शहरातील बगीचे व खुल्या जागांची



नियमित स्वच्छता, दुरुस्ती व सुशोभीकरण करून नागरिकांना आरोग्यदायी वातावरण उपलब्ध करून देण्याची गरज सरिता पाटील यांनी अधोरेखित केली. मुख्याधिकारी जाधव आणि नगराध्यक्ष हर्षल साबळे यांनी निवेदनाचा स्वीकार करत संबंधित समस्यांवर सकारात्मक भूमिका घेतली व लवकरच आवश्यक ती कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले. नगरपरिषदेने या मूलभूत समस्या गांभीर्याने हाताळून नागरिकांना दिलासा द्यावा, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## हिवरखेड मोठा महादेव संस्थानमध्ये शिवपुराण कथा

**हिवरखेड :** प्रभाग ५ मधील मोठा महादेव संस्थान मध्ये श्रावणमासात दिनांक १८, ते २५ दरम्यान ह भ प रामदास चेडे महाराज यांच्या मधुरवाणीतून शिवपुराण कथेचे प्रारंभ होणार तर ह भ प कृष्णा महाराज सदाफळे, कुं धनश्री बांतेताई, कुं, साक्षीताई लुंगे, कुं नेहताई ताळे, वेदात माकोडे महाराज, विजय महाराज कुयटे, सुधीर महाराज खालोकार, रामदास महाराज चेंडे, यांचे हरीकीर्तन रात्री ८, ते १० दरम्यान पार पडणार आहेत


**CHANGE IN NAME**

Name - **Nazmin Bint Younus**
New name - **Nazmin Parveen Mohammad Rashid**
**Adress - Moham-**madiya Plot. Juni Basti Murtizapur Tq. Murtizapur Dist Akola 444107 Maharashtra


## शहरात पावसाची रिमझिम

**अकोला :** अनेक दिवसाच्या प्रतिक्षेनंतर पावसाने पुन्हा आगमन केल्याने शहरवासियांना उकाड्यापासून दिलासा मिळाला आहे, बुधवारी सकाळपासूनच पावसाची रिमझिम सुरू होती.


**अकोला एज्युकेशन सोसायटी, अकोला द्वारा संचालित**
**न्यू इंग्लिश हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, अकोला**
**शैक्षणिक सत्र २०२६-२७ करीता घड्याळी तासिका तत्वावर खालील पदे त्वरीत भरणे आहे.**

| अ.क्र. | विषय | पदसंख्या | शैक्षणिक पात्रता |
|---|---|---|---|
| १ | जीवशास्त्र | ०१ | एम.एससी (जीव), बी.एड. |
| २ | गणित | ०१ | एम.एससी (गणित), बी.एड |
| ३ | इंग्रजी (MCVC) | ०१ | एम.ए. (इंग्रजी), बी.एड. |
| ४ | मराठी (MCVC) | ०१ | एम.ए.(मराठी), बी. एड. |
| ५ | सामान्य पायाभूत अभ्यासक्रम (MCVC) | ०१ | B/E./डिप्लोमा (संगणक) विज्ञान B.C.A. M.C.A. M.Com, B.Ed./MBA |

टिप : इच्छुक उमेदवारांनी अर्ज व कागदपत्रांसह दि.१४-०८-२०२६ ला दुपारी १२.३० वाजता स्वखर्चाने उपस्थित राहावे.

प्राचार्य
न्यू इंग्लिश कनिष्ठ महाविद्यालय व व्यावसायिक अभ्यासक्रम (HSC-Voc) शिक्षण संकुल, अकोला



## नगर परिषद वाशिम , जि. वाशिम

DAY-NULM: D-JAYS

पत्ताः **Email Id:-nulmwashim@gmail.com** जा.क्र./२०२६/नप/२६/२०२६ दि. ११ ऑगस्ट २०२६

### जाहीर सूचना

केंद्र शासनाद्वारे संपूर्ण देशात 'पथविक्रेता (उपजीविकेचे संरक्षण आणि पथविक्री विनियमन) अधिनियम, २०१४ लागू करण्यात आलेला आहे. सदर अधिनियमातील कलम ३६ (१) मधील तरतुदींच्या अनुषंगाने महाराष्ट्र शासनाने 'महाराष्ट्र पथविक्रेता नियम, २०१६ राजपत्रात प्रसिद्ध केले आहेत. सदर केंद्रीय अधिनियमाचे कलम २० आणि राज्य नियमावली २०१६ मधील प्रकरण २, नियम क्र. ३ व ४ नुसार, प्रत्येक स्थानिक प्राधिकरणाच्या कार्यक्षेत्रात नागरी पथविक्रेत्यांच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी व विवादांवर कायदेशीर तोडगा काढण्यासाठी एक स्वतंत्र 'तक्रार निवारण व विवाद निर्णय समिती (Grievance Redresal and Dispute Resolution Committee) घटित करणेबाबत नमूद केलेले आहे.

सदर समितीच्या स्थापनेबाबत महाराष्ट्र पथविक्रेता (उपजीविका संरक्षण व पथविक्री विनियमन) नियम, २०१६ मधील प्रकरण २. नियम क्र. ३ व ४ नुसार या समितीची रचना खालील वैधानिक निकषांनुसार असणे आवश्यक आहे. सदर समितीमध्ये एक अध्यक्ष व इतर दोन व्यावसायिक सदस्य यांची नियुक्ती असेल अशी तरतूद आहे. समितीचे अध्यक्षः दिवाणी न्यायाधीश (Civil Judge) किंवा न्यायदंडाधिकारी (Magistrate) आहेत तर समितीचे इतर दोन सदस्य म्हणून नियुक्तीसाठी खालीलप्रमाणे अर्हता व अनुभव आवयश्क आहे.

| अ.क्र. | पद नाव व सदस्य संख्या | आवश्यक अर्हता व अनुभव |
|---|---|---|
| ०१ | तक्रार निवारण व विवाद निर्णय समिती (व्यावसायिक) सदस्य- एकूण ०२ पदे | (०१) पस्तीस वर्षांहून अधिक वयाची असेल परंतु पासष्ट वर्षांपेक्षा अधिक वयाची नसेल; (०२) मान्यताप्राप्त विद्यापीठाची स्नातक पदवी (Degree) सदस्य- एकूण ०२ पदे धारण करीत असेल, (०३) १: तिला स्थानिक प्राधिकरणामधील कामाचा अनुभव असेल व शासनाचा अवर सचिव किंवा तत्सम दजपिक्षा कमी दर्जा नसलेल अधिकारी म्हणून स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये तिने काम केलेले असेल, आणि (०४) कार्यकुशलता, सचोटी व प्रतिष्ठा असलेली व्यक्ती असेल आणि सामाजिक कार्यामधील अथवा पथविक्रेत्यांशी किंवा सार्वजनिक कामांशी किंवा नागरी वा सार्वजनिक प्रशासनाशी संबंधित समस्या हाताळण्याचे किमान दह वर्षांचे पर्याप्त ज्ञान वा अनुभव असलेली असेल, अशी व्यक्ती, तक्रार निवारण व विवाद निर्णय समितीमध्य सदस्य म्हणून नियुक्ती केली जाण्यास पात्र असेल. या सार्वजनिक प्रशासनाशी संबंधित समस्या हाताळण्याचे किमान दहा वर्षांचे पर्याप्त ज्ञान वा अनुभव असलेली असेल, अशी व्यक्ती, तक्रार निवारण व विवाद निर्णय समितीमध्ये सदस्य म्हणून नियुक्ती केली जाण्यास पात्र असेल. |
| ०२ | पदावधी: | सदर समितीचा कार्यकाळ नियुक्तीच्या दिनांकापासून ५ (पाच) वर्षाचा राहील. |
| ०३ | अर्ज करावयाची मुदत | पात्र आणि इच्छुक उमेदवारांनी आपले अर्ज आवश्यक कागदपत्रांसह १७ ऑगस्ट २०२६ पर्यंत सादर करणे आवश्यक आहे. |

अधिक माहितीसाठी व अर्जाच्या मसुद्यासाठी संपर्कः दी. अ. यो. राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान कक्ष, नगर परिषद वाशिम येथे कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.
दिनांक: ११/०८/२०२६

**अध्यक्ष (श्री. अनिल केंदळे) नगर परिषद वाशिम** | **उपाध्यक्ष (राजुभाऊ भादुर्गे) नगर परिषद वाशिम** | **मुख्याधिकारी (अरविंद मुंढे) नगर परिषद वाशिम**



## नगर परिषद मंगरुळपीर, जि. वाशिम

DAY-NULM: D-JAYS

पत्ताः **Email Id:-aponulm@gmail.com** जा.क्र./२०२६/नप/ १२६२-६३/२०२६ दि. ११ ऑगस्ट २०२६

### : जाहीर सूचना:

केंद्र शासनाद्वारे संपूर्ण देशात 'पथविक्रेता (उपजीविकेचे संरक्षण आणि पथविक्री विनियमन) अधिनियम, २०१४ लागू करण्यात आलेला आहे. सदर अधिनियमातील कलम ३६ (१) मधील तरतुदींच्या अनुषंगाने महाराष्ट्र शासनाने 'महाराष्ट्र पथविक्रेता नियम, २०१६ राजपत्रात प्रसिद्ध केले आहेत. सदर केंद्रीय अधिनियमाचे कलम २० आणि राज्य नियमावली २०१६ मधील प्रकरण २, नियम क्र. ३ व ४ नुसार, प्रत्येक स्थानिक प्राधिकरणाच्या कार्यक्षेत्रात नागरी पथविक्रेत्यांच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी व विवादांवर कायदेशीर तोडगा काढण्यासाठी एक स्वतंत्र 'तक्रार निवारण व विवाद निर्णय समिती (Grievance Redresal and Dispute Resolution Committee) घटित करणेबाबत नमूद केलेले आहे.

सदर समितीच्या स्थापनेबाबत महाराष्ट्र पथविक्रेता (उपजीविका संरक्षण व पथविक्री विनियमन) नियम, २०१६ मधील प्रकरण २. नियम क्र. ३ व ४ नुसार या समितीची रचना खालील वैधानिक निकषांनुसार असणे आवश्यक आहे. सदर समितीमध्ये एक अध्यक्ष व इतर दोन व्यावसायिक सदस्य यांची नियुक्ती असेल अशी तरतूद आहे. समितीचे अध्यक्षः दिवाणी न्यायाधीश (Civil Judge) किंवा न्यायदंडाधिकारी (Magistrate) आहेत तर समितीचे इतर दोन सदस्य म्हणून नियुक्तीसाठी खालीलप्रमाणे अर्हता व अनुभव आवयश्क आहे.

| अ.क्र. | पद नाव व सदस्य संख्या | आवश्यक अर्हता व अनुभव |
|---|---|---|
| ०१ | तक्रार निवारण व विवाद निर्णय समिती (व्यावसायिक) सदस्य- एकूण ०२ पदे | (०१) पस्तीस वर्षांहून अधिक वयाची असेल परंतु पासष्ट वर्षांपेक्षा अधिक वयाची नसेल; (०२) मान्यताप्राप्त विद्यापीठाची स्नातक पदवी (Degree) धारण करीत असेल, (०३) १: तिला स्थानिक प्राधिकरणामधील कामाचा अनुभव असेल व शासनाचा अवर सचिव किंवा तत्सम दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेल अधिकारी म्हणून स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये तिने काम केलेले असेल, आणि (०४) कार्यकुशलता, सचोटी व प्रतिष्ठा असलेली व्यक्ती असेल आणि सामाजिक कार्यामधील अथवा पथविक्रेत्यांशी किंवा सार्वजनिक कामांशी किंवा नागरी वा सार्वजनिक प्रशासनाशी संबंधित समस्या हाताळण्याचे किमान दह वर्षांचे पर्याप्त ज्ञान वा अनुभव असलेली असेल, अशी व्यक्ती, तक्रार निवारण व विवाद निर्णय समितीमध्य सदस्य म्हणून नियुक्ती केली जाण्यास पात्र असेल. या सार्वजनिक प्रशासनाशी संबंधित समस्या हाताळण्याचे किमान दहा वर्षांचे पर्याप्त ज्ञान वा अनुभव असलेली असेल, अशी व्यक्ती, तक्रार निवारण व विवाद निर्णय समितीमध्ये सदस्य म्हणून नियुक्ती केली जाण्यास पात्र असेल. |
| ०२ | पदावधी: | सदर समितीचा कार्यकाळ नियुक्तीच्या दिनांकापासून ५ (पाच) वर्षाचा राहील. |
| ०३ | अर्ज करावयाची मुदत | पात्र आणि इच्छुक उमेदवारांनी आपले अर्ज आवश्यक कागदपत्रांसह १७ ऑगस्ट २०२६ पर्यंत सादर करणे आवश्यक आहे. |

अधिक माहितीसाठी व अर्जाच्या मसुद्यासाठी संपर्कः दी. अ. यो. राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान कक्ष, नगर परिषद मंगरूळपीर येथे कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.
दिनांक: ११/०८/२०२६

**अध्यक्ष (श्री. अशोक परळीकर) नगर परिषद, मंगरूळपीर** | **उपाध्यक्ष (अनिल गावंडे) नगर परिषद, मंगरूळपीर** | **मुख्याधिकारी (अरविंद मुंढे) नगर परिषद, मंगरूळपीर**

सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड
बुधवार, दि. १२ ऑगस्ट २०२६ Web. http://epaper:citynewssuperfast.com


# मंजुरी मिळूनही निधी हवेतच !

## बालसंगोपन योजनेचे 2 हजार लाभार्थी वेटिंगवर

प्रतिनिधी १२ ऑगस्ट

**अकोला :** एकल पालक, अनाथ आणि गंभीर आर्थिक संकटात सापडलेल्या बालकांना मदतीचा हात देणाऱ्या 'क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले बालसंगोपन योजने'च्या अंमलबजावणीत प्रशासकीय अनास्थेचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. अकोला जिल्ह्यात या योजनेअंतर्गत तब्बल २ हजार ४३ नवीन अर्जांना रीतसर मंजुरी देण्यात आली आहे.

कागदपत्रांची छाननी पूर्ण झाली, पात्रता निश्चित झाली; मात्र जुलै २०२५ नंतरच्या एकाही लाभार्थ्याला हक्काचा निधी मिळालेला नाही. सरकारने मंजुरीचे कागदी गाजर दाखवून हात वर केल्याने, गेल्या ५-६ महिन्यांपासून हे कुटुंब आणि निराधार मुले अनुदानाच्या प्रतीक्षेत चातकासारखी वाट पाहत आहेत.जिल्हा पातळीवरील महिला व बालविकास यंत्रणेकडून अर्जांची




तपासणी करून २,८४५ लाभार्थ्यांना पात्र ठरवण्यात आले. यात १ एप्रिल २०२५ ते ३१ मार्च २०२६ या कालावधीत मंजूर झालेल्या २,०४३ नवीन अर्जांचा समावेश आहे. मात्र, खरी अडचण पुणे आयुक्तालय आणि मंत्रालय स्तरावर रखडलेल्या निधी वितरणात निर्माण झाली आहे.

थेट लाभ हस्तांतरण प्रणालीद्वारे ही रक्कम लाभार्थ्यांच्या बँक खात्यात जमा होणे अपेक्षित असताना, जुलै २०२५ पर्यंतच निधीचे वाटप झाले आणि त्यानंतर ही प्रक्रिया पूर्णपणे ठप्प झाली आहे. एकल पालकांच्या संसाराची आर्थिक ओढाताणकोरोनाकाळात अनाथ झालेली मुले, एकाकी माता आणि गंभीर रिस्थितीतील कुटुंबांना मुलांच्या शिक्षण, अन्न आणि आरोग्यासाठी या मासिक अनुदानाचा मोठा आधार असतो. मंजुरी मिळाल्यामुळे आता पैसे मिळतील या आशेने अनेक पालकांनी शैक्षणिक खर्च आणि दैनंदिन गरजांसाठी उसनवारी केली. परंतु, अर्जावर मंजुरीचा शिक्का मारूनही मंत्रालयातून निधीच वर्ग न झाल्याने या गरीब आणि गरजू कुटुंबांवर उपासमारीची व आर्थिक विवंचनेची वेळ आली आहे. मंत्रालयातील लालफितीत फाईल अडकली कुठे?' सर्व प्रक्रिया पूर्ण झाल्यावर जर निधी वर्ग होत नसेल, तर अनाथ आणि गरजू मुलांच्या हक्काच्या पैशांवर सरकारी लालफितीचा कारभार डल्ला मारत आहे का? अकोला जिल्हास्तरावरून प्रक्रिया पूर्ण झाली असताना, पुणे आयुक्तालय आणि महिला व बालविकास मंत्रालयात ही फाईल नक्की कोणत्या अधिकाऱ्याच्या टेबलावर अडकून पडली आहे? डीबीटीचा फोलपणा: डिजिटल इंडिया आणि पारदर्शक कारभाराचा दावा करणारी 'डीबीटी' यंत्रणा महिनोनमहिने पैसे जमा करू शकत नसेल, तर या यंत्रणेचा उपयोग काय?निधी कधी मिळणार? थकीत निधी तातडीने मंजूर करून अकोल्यातील गरजू मुलांच्या खात्यात तो कधीपर्यंत वळवला जाणार?

# अकोला पासपोर्ट कार्यालयाचा विस्तार करा

### खा.अनुप धोत्रे यांची परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांच्याकडे मागणी

प्रतिनिधी १२ ऑगस्ट

अकोला : अकोला येथील पासपोर्ट कार्यालयाचा विस्तार करून तेथे दोन अतिरिक्त काउंटर सुरू करावेत व सहाय्यक कर्मचाऱ्यांची नियुक्ती करावी, अशी मागणी खासदार अनुप धोत्रे यांनी केंद्रीय परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे.

माजी केंद्रीय मंत्री संजय धोत्रे यांच्या पाठपुराव्यामुळे हे केंद्र सुरू झाले असून, आतापर्यंत १ लाखांहून अधिक नागरिकांनी याचा लाभ घेतला आहे.



मात्र, सध्या अपॉइंटमेंटसाठी मोठा विलंब होत असल्याने नागरिकांना नागपूर किंवा हैदराबादला जावे लागत आहे. त्यामुळे ही प्रक्रिया गतिमान व सुलभ करण्यासाठी तातडीने मनुष्यबळ वाढवण्याची गरज खासदारांनी व्यक्त केली.

# मटन मार्केटमधील अतिक्रमणावर महानगरपालिकेचा हातोडा!

प्रतिनिधी १२ ऑगस्ट

**अकोला :** शहरातील मटन मार्केट परिसरात करण्यात आलेल्या अतिक्रमणाविरोधात महानगरपालिकेने धडक कारवाई केली आहे. मटन मार्केट परिसरातील अतिक्रमणामुळे रस्त्याची जागा कमी होऊन या मार्गावर वारंवार वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होत होती. अखेर महानगरपालिकेने अतिक्रमण हटवित परिसर मोकळा करण्याची कारवाई केली असून, यामुळे वाहतुकीला मोठा दिलासा मिळण्याची अपेक्षा आहे.

अकोला शहरातील गजबजलेल्या मटन मार्केट परिसरात अखेर महानगरपालिकेने अतिक्रमणाविरोधात कारवाईचा बडगा उगारला आहे. मटन मार्केट परिसरातील रस्त्याच्या कडेला करण्यात आलेल्या अतिक्रमणामुळे वाहतुकीसाठी उपलब्ध असलेली जागा मोठ्या प्रमाणात कमी झाली होती. विशेषतः गर्दीच्या वेळेत या परिसरातून वाहनांची मोठी वर्दळ असते.

# आमझरी व खटकली परिसरात पर्यटनसंकुल उभारण्याचे आयुक्त लीना बनसोड यांचे निर्देश

प्रतिनिधी १२ ऑगस्ट

**अमरावती:** चिखलदरा तालुक्यातील आमझरी व खटकली या गावात पर्यटन विकासासाठी मोठ्या संधी असून स्थानिक आदिवासी समाजाला नव्या रोजगाराच्या मार्ग उपलब्ध करून देण्याच्या हेतूने येथे पर्यटन संकुल उभरण्यासाठी प्रयत्न करण्याचे निर्देश आदिवासी विकास आयुक्त व शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक लीना बनसोड यांनी दिले. येथील वनविभागाच्या आमझरी संकुलात आयोजित संवाद बैठकीत त्यांनी हे निर्देश दिले.या बैठकीला प्रकल्प अधिकारी सिद्धार्थ शुक्ला, सह आयुक्त दिगंबर चव्हाण, उपायुक्त संतोष ठुबे, उपायुक्त विनिता सोनवणे, उपायुक्त शशिकला अहिरराव, शबरी महामंडळाचे शाखा व्यवस्थापक गणेश साखरे, वरिष्ठ सल्लागार प्रशांत ब्राह्मणकर आणि विविध विभागांचे अधिकारी, स्थानिक नागरिक व पर्यटन समितीचे सदस्य यावेळी उपस्थित होते. स्थानिकांनी पारंपरिक व उत्स्फूर्त पद्धतीने मान्यवरांचे स्वागत केले आणि आदिवासी बांधवांनी संवाद सत्रात उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला.बैठकीत लीना बनसोड यांनी सांगितले की शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाच्या माध्यमातून पर्यटन योजना राबवल्या जात आहेत.आमझरी व खटकली भागातील नैसर्गिक सौंदर्याचे संवर्धन करताना स्थानिक संस्कृती, परंपरा आणि आदिवासी खाद्यपरंपरेला जागतिक पातळीवर ओळख देण्याचे काम आदिवासी विकास विभाग करीत आहे. त्यांनी या परिसरासाठी एक सर्वसमावेशक व आकर्षक टुरिस्ट प्लॅन तयार करण्याचे स्पष्ट निर्देश दिले आणि पर्यटकांना भेट देण्यासारख्या स्थळांचे, अनुभवांचे व मार्गनिर्दशनाचा संपूर्ण आराखडा तयार करण्याच्या सूचना दिल्या.



अकोला महानगरपालिकेच्या वतीने 'हर घर तिरंगा' अभियानाच्या पार्श्वभूमीवर तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आले. मनपा आयुक्त सुनील लहाने यांच्यासह अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी या रॅलीत उत्स्फूर्त सहभाग घेतला. हातात तिरंगा घेत देशभक्तीच्या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला.

# एकलारा ग्रा.पं.घरकुल गैरव्यवहारावरून वाद

प्रतिनिधी १२ ऑगस्ट

**अकोला :** अकोला तालुक्यातील एकलारा ग्रामपंचायत अंतर्गत राबवण्यात येणाऱ्या शासकीय घरकुल योजनेमध्ये गंभीर अनियमितता आणि फसवणूक झाल्याचे प्रकरण समोर आले आहे. तक्रारदार श्री. चेतन गजानन खेडकर यांनी ग्रामपंचायत प्रशासनाकडे दिलेल्या तक्रारीनुसार, योजनेतील लाभार्थी गणेश किसन बेले आणि उमेश शंकर गावंडे यांनी प्रत्यक्ष घरकुलाचे बांधकाम न करता किंवा निकष पूर्ण न करताच शासकीय निधी उचलून शासनाची फसवणूकी चा आरोप करण्यात आला आहे.

# तीन महिन्यांच्या एकत्रित रेशन वितरणात पुन्हा अडथळे

प्रतिनिधी १२ ऑगस्ट

**खामगाव:** केंद्र व राज्य शासनाच्या आदेशानुसार ऑगस्ट ते ऑक्टोबर २०२६ या तीन महिन्यांचे रेशन धान्य एकत्रित वितरित करण्याचा निर्णय आहे. घेण्यात आला शिधापत्रिका धारकांसाठी हा निर्णय दिलासादायक असला, तरी त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी करताना रेशन दुकानदार आणि पुरवठा विभागासमोर अनेक अडचणी निर्माण झाल्या आहे..

सध्या पॉस मशीनवर केवळ ऑगस्ट महिन्याचा कोटा दाखविला जात असल्याने जिल्ह्यात बहुतांश ठिकाणी ऑगस्ट महिन्याचेच धान्य वितरण सुरू आहे. काही ठिकाणी ऑगस्टचेही वाटप अद्याप सुरू



झालेले नसल्याचे चित्र आहे. शासनाने तीन महिन्यांचे धान्य एकत्रित देण्याचा निर्णय घेतला असला, तरी त्यासाठी संपूर्ण कोटा पॉस मशीनवर उपलब्ध होणे आवश्यक आहे. मात्र, सध्या केवळ ऑगस्ट महिन्याचा कोटा प्रणालीवर दाखविला जात असल्याचे पुरवठा विभागाकडून सांगण्यात आले आहे.

त्यामुळे सप्टेंबर आणि ऑक्टोबर महिन्याचा कोटा एकत्रितपणे कसा वितरित होणार, याबाबत संभ्रम निर्माण झाला आहे.

# वंचित बहुजन आघाडीचे प्रदेशाध्यक्ष राजेंद्र पातोडे यांचा मराठा सेवा संघाच्या वतीने भव्य सत्कार संपन्न

प्रतिनिधी १२ ऑगस्ट

**अकोला :** वंचित बहुजन आघाडीच्या महाराष्ट्र प्रदेशाध्यक्षपदी राजेंद्र पातोडे यांची लोकशाही पद्धतीने मतदानातून निवड झाल्याबद्दल मराठा सेवा संघ, आणि जिजाऊ ब्रिगेडच्या वतीने अकोला येथील मराठा सेवा संघ जिल्हा कार्यालयात त्यांचा हृद्य सत्कार करण्यात आला.

शिव शाहु फुले आंबेडकर विचारधारेवर काम करणाऱ्या या चळवळीने प्रचंड मताधिक्याने लोकशाही मार्गाने निवडून आलेल्या राजेंद्र पातोडे यांचा गौरव केला.या सोहळ्याला मराठा सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष डॉ. रणजीत कोरडे, माजी जिल्हाध्यक्ष डॉ. पुरुषोत्तम तायडे, प्रदेश संघटक



प्राचार्य प्रशांत जानोळकर, प्रदेश सदस्य उत्तमराव माने, प्रदेश सदस्य प्रा. प्रदीप चोरे, प्रवक्ते प्रेमकुमार बोके, जिजाऊ ब्रिगेडच्या प्रदेशाध्यक्ष सीमाताई बोके, प्रदेश संघटिका अक्काताई माने जिल्हाध्यक्षा रेणुताई गावंडे यांच्यासह जिल्ह्यातील सर्व पदाधिकारी उपस्थित होते.

मनोगत व्यक्त करताना राजेंद्र पातोडे यांनी सर्व पुरोगामी चळवळींनी एकदिलाने, अठरापगड जाती धर्मांना सोबत घेऊन काम करण्याचे आवाहन केले.छत्रपती शिवाजी महाराजांनी उभारलेल्या स्वराज्याच्या धर्तीवर पुन्हा एकदा तसेच स्वराज्य उभे करण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला.शिव शाहू फुले आंबेडकर विचारांच्या सर्व सामाजिक चळवळींनी हातात हात घालून काम करण्याचे तसेच महाराष्ट्रासह देशाला प्रतिगामी विचारांच्या जोखडातून मुक्त करून पुरोगामी दिशेने नेण्याचे आश्वासन त्यांनी दिले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मराठा सेवा संघाचे सचिव प्रा. संदीप निर्मळ यांनी केले, तर शिवश्री पंकज जायले यांनी प्रास्ताविकातून सत्कार समारंभाची भूमिका मांडली. या प्रसंगी वंचित बहुजन युवा आघाडीचे जिल्हाध्यक्ष श्रीकांत घोगरे, राजकुमार दामोदर, सचिन शिरोळे यांच्यासह मराठा सेवा संघ, व जिजाऊ ब्रिगेडसह विविध कक्षाचे जिल्ह्यातील सर्व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पॅरिसमध्ये होणाऱ्या जागतिक वीज प्रसारण परिषदेसाठी सुनील जाधव यांची निवड



प्रतिनिधी १२ ऑगस्ट

**अकोला:** गायत्री नगर कौलखेड रोड निवासी तथा इंडीग्रीडचे उपाध्यक्ष सुनील जाधव यांची पॅरिस येथे 23 ते 27 ऑगस्ट दरम्यान आयोजित CIGRE 2026 या जगातील प्रतिष्ठित वीज प्रसारण परिषदेसाठी निवड झाली आहे.

या परिषदेत 99 देशांतील 4,500 हून अधिक वीज क्षेत्रातील तज्ज्ञ सहभागी होणार असून, 1,100 हून अधिक तांत्रिक संशोधनपत्रे सादर केली जाणार आहेत. जागतिक व्यासपीठावर प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळणे ही अभिमानाची आणि सन्मानाची बाब आहे. त्यांनीं हे यशाचे शिखर गाठल्याबद्दल आखिल भारतीय मराठा महासंघाच्या वतीने त्यांच्या निवासस्थानी जाऊन त्यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला.

यावेळी महासंघाचे पदाधिकारी विनायकराव पवार, संजय सूर्यवंशी, डॉ. अजय काळे, अरुण खोटरे , जितेंद्र गावंडे,ढगे, कल्पनाताई बिडवे, सिंधुताई पवार, माधुरी वाघमारे, राखी पटेकर, छायाताई पवार, वैशाली कदम, उज्वला बावस्कर आदी उपस्थित होते.

# चतुर्थ श्री श्याम झुलनोत्सव आज

प्रतिनिधी १२ ऑगस्ट

**अकोला :** श्री खाटू श्याम परिवार, अकोला यांच्या वतीने बुधवार, १२ ऑगस्ट रोजी सायंकाळी ५ वाजता चतुर्थ श्री श्याम झुलनोत्सवाचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. शहराच्या मध्यवर्ती भागातील कृषी उत्पन्न बाजार समिती परिसरात हा झुलनोत्सव भक्तिमय वातावरणात पार पडणार आहे.

यावेळी श्री श्याम प्रभूंचा अलौकिक श्रृंगार, अखंड ज्योत, सवामणी प्रसाद तसेच छप्पन भोगाचे आयोजन करण्यात आले आहे. यासोबतच नामवंत भजन गायकांच्या मधुर भजनांची अमृतवर्षा होणार आहे. त्या सोबतच कार्यक्रमात दिल्लीचे श्री शीतल पांडे, जयपूरचे श्री




महेश परमार, इंदूरचे श्री पं. उमेश शर्मा यांच्यासह अन्य भजन कलाकार श्याम प्रभूंच्या भजनांची सेवा सादर करणार आहेत. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी उदयपूरवाले पुरुषोत्तम शर्मा असून मंच संचालन श्री गोपाल गंगवाल करणार आहेत. कार्यकमाचे विशेष आकर्षण राजस्थानातील खाटूधाम येथे जाता न येणाऱ्या भाविकांसाठी अकोला शहरातच खाटू श्याम मंदिराची प्रतिकृती साकारण्यात आली आहे. ज्याचा दर्शनाचा मोठ्या संख्येने कुटुंबीय व इष्ट-मित्रांसह सर्व श्याम भक्तांनी लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजक 'श्याम के दीवाने' तसेच निवेदक श्री खाटू श्याम परिवाराच्या वतीने करण्यात आले आहे.

# कस्तुरी चॅरिटेबल सोसायटीतर्फे 26 ऑगस्ट रोजी रक्तदान शिबिर

प्रतिनिधी १२ ऑगस्ट

**अकोला:** कस्तुरी चॅरिटेबल सोसायटी ('क' वर्ग तीर्थक्षेत्र दर्जा मान्यता प्राप्त संस्था) आणि डॉ. हेडगेवार रक्तपेढी यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवार, २६ ऑगस्ट २०२६ रोजी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. गरजू रुग्णांच्या सेवेसाठी हे संकलित रक्त अर्पण केले जाणार आहे.

हे शिबीर कस्तुरी परिसर, श्री संत गजानन महाराज मंदिर, गायगाव रोड, अकोला येथे सकाळी १० ते दुपारी १ या वेळेत पार पडेल. रक्तदान करणाऱ्या सर्व रक्तदात्यांचा प्रशस्तीपत्र, देववस्त्र व गुलाबपुष्प देऊन विशेष सन्मान करण्यात येणार आहे. तसेच



कार्यक्रमाची सांगता महाप्रसाद / स्वरुचिभोजाने होईल.

"रक्तदान हेच जीवनदान" आणि "रक्तदान महादान" या उदात्त भावनेतून नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून रक्तदान करावे, असे आवाहन कस्तुरी चॅरिटेबल सोसायटी, अकोला (मो. नं. ९४२२८६१९७७) यांच्यातर्फे करण्यात आले आहे.

# आदिवासी आश्रमशाळांतील 468 शिक्षक पदांसाठी भरती प्रक्रिया सुरु

प्रतिनिधी १२ ऑगस्ट

**अमरावती :** अपर आयुक्त, आदिवासी विकास, अमरावती यांच्या अधिनस्त असलेल्या धारणी, पांढरकवडा, किनवट, अकोला, छत्रपती संभाजीनगर, पुसद आणि कळमनुरी या सात एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पांच्या कार्यक्षेत्रातील ८५ शासकीय आश्रमशाळांमध्ये शिक्षक संवर्गातील ४६८ रिक्त पदांची भरती प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. अनुसूचित (पेसा) तसेच अनुसूचित क्षेत्राबाहेरील (नॉन-पेसा) शासकीय आश्रमशाळांमधील रिक्त पदांची पदनिहाय जाहिरात ६ ऑगस्ट २०२६ रोजी (पवित्र) पोर्टलवर प्रसिद्ध करण्यात आली आहे. ही भरती प्रक्रिया मुलाखतीशिवाय करण्यात येणार आहे.

या भरतीमध्ये कनिष्ठ महाविद्यालय शिक्षण सेवक, माध्यमिक शिक्षण सेवक (मराठी माध्यम), माध्यमिक शिक्षण सेवक (इंग्रजी माध्यम), प्राथमिक शिक्षण सेवक (मराठी माध्यम) आणि प्राथमिक शिक्षण सेवक (इंग्रजी माध्यम) या पदांचा समावेश आहे. शिक्षक पदभरतीची प्रक्रिया पवित्र पोर्टलच्या माध्यमातून पारदर्शक पद्धतीने राबविण्यात येत आहे. इच्छुक उमेदवारांनी https://tait2025.mahateach-errecruitment.org.in या (पवित्र पोर्टलवरील अधिकृत संकेतस्थळ) येथे जाऊन पदांची उपलब्धता, पात्रता व पात्रतेसंबंधी आवश्यक माहिती तपासून विहित वेळेत अर्ज प्रक्रियेतील पुढील कार्यवाही पूर्ण करावी.

पवित्र पोर्टल प्रणालीवर उपलब्ध पदे विचारात घेऊन पात्र उमेदवारांना आपला पसंतीक्रम ६ ऑगस्ट ते १३ ऑगस्ट २०२६ या कालावधीत नोंदविता येणार आहे. त्यामुळे पात्र व इच्छुक उमेदवारांनी विहित मुदतीत पसंतीक्रम नोंदविण्याची कार्यवाही पूर्ण करावी, असे आवाहन अमरावतीचे अपर आयुक्त, आदिवासी विकास संदीप गोलाईत यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे केले आहे.

# सायबर गुन्ह्यातील आंतरराष्ट्रीय टोळी जेरबंद

प्रतिनिधी १२ ऑगस्ट




**अमरावती** : Mule Account (सायबर फसवणुकीतुन येणारी रक्कम घेण्यासाठी वापरण्यात येणारे बँक खाते) उपलब्ध करून सायबर गुन्हेगारांना मदत करणाऱ्या आंतरराज्यीय टोळी जेरबंद करण्यात सायबर पोलीस यशस्वी वेगवेगळया दोन गुन्हामध्ये आणखी 6 आरोपींना अटक सायबर पोलीस स्टेशन, अमरावती शहर यांनी Mule Account Hotspot चे तांत्रीक विश्लेषणाच्या आधारे केलेल्या तपासात सायबर फसवणुकीतून प्राप्त झालेली रक्कम आरोपीच्या बँक खात्यात जमा करून ती पुढे विविध बँक खात्यांमध्ये व इतर माध्यमांतून हस्तांतरित करण्यात येत असल्याचे निष्पन्न करुन सदर खाते सायबर फसवणूक, ऑनलाइन गेमिंग व क्रिप्टोकरन्सी व्यवहारांसाठी Mule Account म्हणून वापरण्यात आल्याचे निष्पन्न केले होते. सदर खात्यावर सुमारे ₹71,00,000/- (अक्षरी एकाहत्तर लाखांचे) आर्थिक व्यवहार झाल्याचे दिसुन आल्याने पोलीस स्टेशन सायबर, अमरावती शहर येथे अप. क्र. 25/2026 अन्वये कलम 318(4), 112(2), 3(5), 61(2) भारतीय न्याय संहिता (BNS) तसेच कलम 66 (D) माहिती तंत्रज्ञान अधिनियम (IT Act) अंतर्गत गुन्हा दाखल करून तपासाअंती 3 आरोपींना अटक करण्यात आली होती. सायबर पोलीस स्टेशनमधील इतर गुन्हयाचा समांतर तपास व तांत्रीक विश्लेषण करीत असतांना अप. क्र. 21/2026 अन्वये कलम 318(4), 112(2), 3(5), 61(2) भारतीय न्याय संहिता (BNS) तसेच कलम 66(D) माहिती तंत्रज्ञान अधिनियम (IT Act) मध्ये प्राप्त माहितीनुसार आरोपी करण दिनेश तानोलकर, रा. म्हाडा कॉलनी, न्यु टाऊन बडनेरा, रोहन प्रभाकर वैद्य, रा. पवन नगर, नवि वस्ती, बडनेरा, सौरभ नितीन नेपाळे, रा. कालीमाता मंदिरजवळ, नाथवाडी, अमरावती, अजिंक्य गजानन गिरी, रा. न्यु कॉलनी, दस्तुर नगर, अमरावती तसेच अप. क्र. 23/2026 अन्वये कलम 318(4), 112(2), 3(5), 61(2) भारतीय न्याय संहिता (BNS) तसेच कलम 66(D) माहिती तंत्रज्ञान अधिनियम (IT Act) मध्ये आरोपी विजय महेशलाल झामनानी, रा. रामपुरी कॅम्प, गल्ली नं. २, अमरावती, मयुर हरिष मोटवानी, रा. कृष्णा नगर, गल्ली नं. १, अमरावती यांना अटक करण्यात आली आहे. नमुद दोन्ही गुन्हयामध्ये एकुण सहा (६) आरोपींना अटक करण्यात आली असून त्यांची पोलीस कोठडी मिळविण्यात आली आहे.

# अमरावती महानगरपालिकेचा वर्धापन दिन जनसहभागातून साजरा होणार

## १२ ते १५ ऑगस्टदरम्यान तिरंगा यात्रा, वृक्षारोपण, रक्तदान-आरोग्य शिबिर; माजी महापौरांचा सन्मान आणि 'फोक ललकार'चा सांस्कृतिक जागर

प्रतिनिधी १२ ऑगस्ट

**अमरावती** : अमरावती महानगरपालिकेच्या वर्धापन दिनानिमित्त यंदा केवळ औपचारिक कार्यक्रम न घेता 'सेवा, संस्कृती, पर्यावरण आणि राष्ट्रभक्ती' या चतुःसूत्रीवर आधारित व्यापक जनसहभागाचा उपक्रम राबविण्यात येणार आहे. दि. १२ ते १५ ऑगस्ट २०२६ या कालावधीत महानगरपालिकेच्या वतीने विविध सामाजिक, पर्यावरणपूरक, आरोग्यविषयक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून, या माध्यमातून अमरावती शहराच्या विकासाचा आणि सामाजिक बांधिलकीचा नवा संदेश देण्यात येणार आहे. महानगरपालिकेचा वर्धापन दिन हा शहराच्या आजवरच्या विकासप्रवासाचा आढावा घेण्याबरोबरच भविष्यातील अमरावती अधिक स्वच्छ, सुंदर, हरित, निरोगी आणि सक्षम करण्याचा संकल्प करण्याचा दिवस म्हणून साजरा करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. या सर्व कार्यक्रमांमध्ये नगरसेवक, अधिकारी-कर्मचारी, सामाजिक संस्था, युवक, महिला तसेच सर्वसामान्य नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे. वर्धापन दिनाच्या कार्यक्रमांची सुरुवात दि. १२ ऑगस्ट रोजी दुपारी ४ वाजता नेहरू मैदान येथून भव्य तिरंगा यात्रेने होणार आहे. स्वातंत्र्य दिनाच्या पार्श्वभूमीवर आयोजित या तिरंगा यात्रेतून राष्ट्रीय एकात्मता, राष्ट्रप्रेम आणि सामाजिक ऐक्याचा संदेश अमरावतीकरांपर्यंत पोहोचविण्यात येणार आहे. दि. १३ ऑगस्ट रोजी सकाळी ८ वाजता कल्पतरू मंगल कार्यालय, रहाटगाव रिंग रोड येथे वृक्षारोपण कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. वाढते शहरीकरण आणि पर्यावरणीय आव्हाने लक्षात घेता अमरावती शहराला अधिक हरित करण्यासाठी वृक्षारोपणासोबतच वृक्षसंवर्धनाचा संकल्प करण्यात येणार आहे. 'वृक्ष लावा आणि वृक्ष जगवा' हा संदेश या उपक्रमातून देण्यात येणार आहे. तसेच दि. १४ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता संत ज्ञानेश्वर सभागृह, मोर्शी रोड येथे रक्तदान शिबिर व आरोग्य तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले आहे. रक्तदानाच्या माध्यमातून गरजू रुग्णांना जीवनदान देण्याचे कार्य नागरिकांच्या सहभागातून करण्यात येणार असून, आरोग्य तपासणीच्या माध्यमातून नागरिकांमध्ये आरोग्यविषयक जनजागृती निर्माण करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. दरम्यान, दि. १५ ऑगस्ट रोजी सायंकाळी ६.३० वाजता संत ज्ञानेश्वर सभागृह येथे माजी महापौरांचा विशेष सत्कार करण्यात येणार आहे.

# गौरीने वाढविला अमरावतीचा गौरव -आ. सुलभा खोडके

प्रतिनिधी १२ ऑगस्ट



**अमरावती:** अमरावती शहरात प्रतिभासंपन्न खेळाडू असून त्यांच्या अंगीभूत क्रीडा कौशल्याला प्रोत्साहन देऊन त्यांना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळणे आवश्यक आहे.

अमरावतीच्या खेळाडूंनी ऑलम्पिक, राष्ट्रकुल, एशियन स्पर्धा तसेच आयपीएल सारख्या स्पर्धांमध्ये दमदार कामगिरी करत संधीच सोनं केलं आहे. अमरावतीची कन्या कु. गौरी दादाराव कलाने हिने १० व्या एशियन यूथ एरोबिक जिम्नॅस्टिक्स चॅम्पियनशिपमध्ये भारताचे प्रतिनिधित्व करणे हि बाब अमरावतीच्या लौकिकात भर घालणारी असून गौरीने आंतराष्ट्रीय स्तरावर अमरावतीचा गौरव वाढविला असल्याचे प्रतिपादन आमदार - सौ. सुलभाताई खोडके यांनी केले. नुकतीच फिलिपाइन्समध्ये झालेल्या १० व्या एशियन यूथ एरोबिक जिम्नॅस्टिक्स चॅम्पियनशिपमध्ये अमरावतीच्या कु. गौरी दादाराव कलाने हिने महाराष्ट्राच्या २५ खेळाडूंसह भारत देशाचे प्रतिनिधित्व केले.

या स्पर्धेत गौरीच्या दमदार कामगिरीबद्दल अमरावतीच्या आमदार- सौ. सुलभाताई खोडके यांनी गौरीचे स्वागत , सत्कार करीत अभिनंदन केले. गौरीसारख्या गुणवंत खेळाडूंच्या यशाला प्रोत्साहन देणे आणि त्यांना पाठबळ देणे ही आपल्या सर्वांचीच जबाबदारी असून तिच्या जिद्दीला, मेहनतीला आणि देशाचे नाव उंचावण्याच्या या कामगिरीबद्दल तिचा यथोचित सत्कार करीत भावी वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी अमरावती मनपा स्थायी समिती सभापती - अविनाश मार्डीकर, गौरीचे वडील - दादाराव कलाने, मनोज केवले आदींसह स्नेहीजन व हितचिंतक प्रामुख्याने उपस्थित होते.

# जिल्हा सामान्य रुग्णालयात रुग्णांना शासकीय माणकानुसार सुविधा उपलब्ध करुन द्या

प्रतिनिधी १२ ऑगस्ट

**अमरावती** : जिल्हा सामान्य रुग्णालयात दि. ८ ऑगस्ट २०२६ रोजी दिव्यांग व्यक्तिना ऑपरेशन करीता सकाळी ९ वाजता बोलाविण्यात आले होते व त्यांना आपण दुपारी २ वाजता ताटकळत ठेवले व २ वाजता सांगितले की, आज ऑपरेशन होणार नाही व त्यामध्ये सुद्धा सदर रुग्णास पायऱ्या चढून व तेही घासत, घासत जावे लागले. ही घटना चीड आणणारी असुन यासाठी जे जबाबदार आहेत. त्यांचेवर योग्य ती कार्यवाही करण्यात यावी व तसेच जिल्हा सामान्य रुग्णालयात शासकीय आरोग्य माणकानुसार रुग्णांना सुविधा उपलब्ध करुन देण्यात

### जिल्हा शल्य चिकित्सकांकडे काँग्रेसचे किशोर बोरकर यांची मागणी

याव्यात. सामान्य रुग्णालयात नेहमीच रुग्णांना चांगली वागणूक तर मिळतच नाही व आवश्यक तां औषधोपचार सुद्धा उपलब्ध करुन देण्यात येत नाही व तसेच विद्युत पुरवठा सुद्धा वारंवार खंडीत होतो. लिफ्ट नहमी चालू बंद राहते.

अशी मागणी काँग्रेसचे नेते किशोर बोरकर यांनी जिल्हा शल्य चिकित्सकांकडे केली आहे. गरजु गरीब, दारिद्र रेषेखालील रुग्णांना आवश्यक व इमरजन्सी वेळेस जिल्हा सामान्य रुग्णालयातुन औषधोपचार मिळत नाही.

# हर घर तिरंगा' अभियानात अमरावतीकरांनी उत्स्फूर्त सहभाग घ्यावा : आ. प्रविण पोटे पाटील

प्रतिनिधी १२ ऑगस्ट

अमरावती : स्वातंत्र्यदिनाच्या पार्श्वभूमीवर देशभरात राबविण्यात येत असलेल्या 'हर घर तिरंगा' अभियानात अमरावती जिल्ह्यातील नागरिकांनी उत्स्फूर्तपणे सहभागी व्हावे, असे आवाहन आमदार प्रविण पोटे पाटील यांनी केले आहे. प्रत्येक नागरिकाने आपल्या घरावर अभिमानाने तिरंगा फडकवून राष्ट्रप्रेम आणि देशभक्तीची भावना व्यक्त करावी, असे त्यांनी सांगितले. 'हर घर तिरंगा' हे अभियान केवळ घरावर राष्ट्रध्वज फडकविण्यापुरते मर्यादित नसून, देशाच्या स्वातंत्र्यासाठी बलिदान देणाऱ्या स्वातंत्र्यसैनिकांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याची तसेच राष्ट्रीय एकात्मता, बंधुभाव आणि देशाभिमानाची भावना अधिक दृढ करण्याची ही एक महत्त्वपूर्ण संधी आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदीजी आणि महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत अमरावती जिल्ह्यातील नागरिकांनी या अभियानात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आ. प्रविण पोटे पाटील यांनी म्हटले आहे.

जिल्ह्यातील प्रत्येक घरासोबतच शाळा, महाविद्यालये, शासकीय व निमशासकीय कार्यालये, विविध सामाजिक संस्था आणि संघटनांनीही या अभियानात सक्रिय सहभाग घ्यावा. युवक, विद्यार्थी, महिला, ज्येष्ठ नागरिक तसेच विविध सामाजिक व स्वयंसेवी संस्थांनी पुढाकार घेऊन 'हर घर तिरंगा' अभियानाला व्यापक स्वरूप द्यावे, असे आवाहनही त्यांनी केले. तिरंगा हा भारताच्या सार्वभौमत्वाचा, स्वाभिमानाचा आणि राष्ट्रीय एकात्मतेचा गौरवशाली प्रतीक आहे. त्यामुळे स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने प्रत्येक नागरिकाने तिरंग्याचा सन्मान राखत राष्ट्रभक्तीची भावना मनामनात जागवावी आणि 'हर घर तिरंगा' अभियानात सहभागी होऊन देशाच्या गौरवात आपले योगदान द्यावे, असे आ. प्रविण पोटे पाटील यांनी आवर्जून सांगितले.

# विवरा ग्रामवासियांच्या शेत रस्त्याच्या अतिक्रमणावर तोडगा न निघाल्याने ग्रामस्थ 15 ऑगस्ट रोजीच्या आमरण उपोषणावर ठाम

प्रतिनिधी १२ ऑगस्ट



**मलकापुर:** तालुक्यातील ग्राम विवरा येथील विवरा - रणगांव रस्त्याचे काम दोघा-तिघा शेतकऱ्यांनी अडविले असून ग्रामस्थांना या अपूर्ण रस्त्याने शेतात ये -जा करण्यासाठी त्रास होत असल्याने ग्रामस्थांनी जिल्हाधिकारी यांना दि.०३ ऑगस्ट रोजी निवेदन देत दहा दिवसांत अपूर्ण रस्त्याचे काम पूर्ण न केल्यास दि. १५ ऑगस्ट २६ रोजी आमरण उपोषणाचा इशारा दिला होता. त्या अनुषंगाने तहसीलदार समाधान सोनवणे यांनी दि.०८ ऑगस्ट रोजी सार्वजनिक बांधकाम विभाग, जिल्हा परिषद बांधकाम विभाग, सिंचन विभाग, मंडळ अधिकारी तलाठी, ग्रामसेवक आदींची तातडीची बैठक बोलावून दि. १० ऑगस्ट २६ रोजी पोलीस बंदोबस्तात भूमी अभिलेख विभागाच्या वतीने मोजणी करून हद्दीच्या खुणा कायम करून शेतरस्त्याचे कामकाज सुरू करण्याच्या सूचना दिल्या होत्या त्यानुसार उपरोक्त संबंधित सर्वच विभागाच्या अधिकाऱ्यांनी मोजणीस सुरुवात केली असता दोघा-तिघा शेतकऱ्यांनी अडविल्याने अपूर्ण रस्त्याचा तोडगा निघाला नाही.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, विवरा -रणगांव शेत रस्ता, विवरा दसरखेड रस्त्यावरील नाला खोलीकरण व रुंदीकरण, जि प बांधकाम कॉंक्रीट रस्ता आदी अपूर्ण काम पूर्ण करण्याच्या मागणी अनुषंगाने दि.१०ऑगष्ट रोजी सां.बा विभाग पडघान,जि.प बांधकाम विभाग उबाळे, सिंचन विभाग वैभव रामेकर,मंडळ अधिकारी वानखेडे, तलाठी जायभाये, ग्रामसेवक मोरे,बिट जमादार पवार पोलीस ताफ्यासह शेतरस्ता हद्दीच्या खुणा कायम करण्यासाठी आले असता दोघा -तिघा शेतकऱ्यांनी रस्ता अडविल्याने व नाल्यावरील अतिक्रमण न काढल्याने विवरा ग्रामस्थ संतप्त झाले असून दि. १५ ऑगस्ट रोजीच्या तहसील कार्यालयासमोर आमरण उपोषणावर ठाम असल्याचे शिवसेना (उबाठा) उपजिल्हाप्रमुख गजानन ठोसर, शिवसेना विधानसभा संघटक राजेश सिंह राजपूत यांनी सांगितले आहे.

# माटरगाव पुलाच्या दुरुस्तीचे जिल्हाधिकाऱ्यांना आदेश

प्रतिनिधी १२ ऑगस्ट

**खामगाव** : मुसळधार पावसामुळे शेगाव तालुक्यातील माटरगावजवळील पूल वाहून गेल्याने माटरगाव, बेलुरा आणि माटरगाव खुर्द या तीन गावांचा संपर्क विस्कळीत झाला आहे. पुलाच्या दुरुस्तीबाबत माजी आमदार दिलीपकुमार सानंदा यांनी ४ ऑगस्ट रोजी मुंबई येथे पालकमंत्री मकरंद पाटील यांची भेट घेऊन निवेदन दिले. या निवेदनाची दखल घेत पालकमंत्र्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना तात्पुरती दुरुस्ती करून प्रस्ताव शासनास सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. पूल वाहून गेल्याने तीन गावांतील नागरिकांच्या दळणवळणाचा प्रश्न निर्माण झाला आहे. विद्यार्थ्यांना शाळेत जाण्यास अडचणी येत असून, शेतकऱ्यांनाही शेतमाल बाजारपेठेत नेण्यासाठी त्रास सहन करावा लागत आहे.

# नगर परिषद कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांकडे प्रशासनाचे लक्ष वेधले

प्रतिनिधी १२ ऑगस्ट

**खामगाव** : नियमित वेतन, सेवानिवृत्तीवेतन, कुटुंब निवृत्तीवेतन तसेच सेवानिवृत्तीनंतरचे विविध लाभ वेळेत मिळावेत, यासह अन्य प्रलंबित मागण्यांसाठी खामगाव नगर परिषद कर्मचारी संघटनेने प्रशासनाचे लक्ष वेधले आहे. या मागण्यांचे निवेदन कर्मचारी संघटनेच्या वतीने नगर परिषद मुख्याधिकाऱ्यांना सादर करण्यात आले. नगर परिषद कर्मचारी नागरिकांना विविध नागरी सेवा सातत्याने उपलब्ध करून देण्यासाठी काम करतात. मात्र, वेतन आणि निवृत्तीविषयक देयकांमध्ये विलंब होत असल्याने कर्मचारी तसेच त्यांच्या कुटुंबीयांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे संघटनेने निवेदनात म्हटले आहे. कर्मचाऱ्यांचे नियमित वेतन, सेवानिवृत्तीवेतन आणि कुटुंब निवृत्तीवेतन दरमहा ५ तारखेच्या आत अदा करावे, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना उपदान, रजा रोखीकरण, भविष्य निर्वाह निधीतील देय रक्कम, निवृत्तीवेतन तसेच इतर अनुज्ञेय निवृत्ती लाभ तातडीने अदा करावेत, अशी मागणीही संघटनेने केली आहे. र्मचाऱ्यांची प्रलंबित वैद्यकीय प्रतिपूर्तीची बिले तपासून आवश्यक प्रशासकीय कार्यवाही पूर्ण करावी. त्यानंतर ही बिले तातडीने मंजूर करून संबंधित कर्मचाऱ्यांना रक्कम अदा करावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. कर्मचारी आणि त्यांच्या कुटुंबीयांच्या आर्थिक सुरक्षिततेचा विचार करून प्रशासनाने या मागण्यांकडे तातडीने लक्ष द्यावे व सकारात्मक निर्णय घेऊन त्याची अंमलबजावणी करावी, अशी विनंती संघटनेने केली आहे. मागण्यांवर तातडीने कार्यवाही न झाल्यास कर्मचाऱ्यांमध्ये असंतोष निर्माण होण्याची शक्यता असून, त्याची संपूर्ण जबाबदारी प्रशासनाची राहील, असा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे. निवेदन देताना कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष मोहन अहिर, दुर्गासिंह ठाकूर, मंगेश पंचभुते, भागवत सुतवणे, रुपेश मोरे, दीपक कदम, रमेश वैराळे, बाळू सरकटे, अजय गवळे यांच्यासह अन्य कर्मचारी उपस्थित होते.

### नियमित वेतन, निवृत्तीवेतनासह वैद्यकीय प्रतिपूर्तीची बिले तातडीने अदा करण्याची मागणी

# विठुरायाचे दर्शन घेऊन संत मुक्ताबाई पालखीचा 16 ऑगस्ट रोजी मलकापुरात मुक्काम

## महिनाभराच्या प्रवासानंतर संत मुक्ताबाई स्वगृही परतणार, टाळ-मृदंगाच्या गजरात शहरातून मिरवणूक

प्रतिनिधी १२ ऑगस्ट




**मलकापुर** : आषाढी एकादशीनिमित्त श्री. क्षेत्र मुक्ताईनगर येथून पंढरपूरच्या विठुरायाच्या दर्शनासाठी निघालेली आदिशक्ती संत मुक्ताबाई यांची पालखी विठुरायाचे दर्शन घेऊन आता स्वगृही परतीच्या प्रवासाला लागली आहे. सुमारे ६०० किलोमीटरचा पायी प्रवास करत सहा जिल्ह्यांतून मार्गक्रमण करणाऱ्या या पालखी सोहळ्याचे १६ ऑगस्ट रोजी मलकापुर येथे आगमन होणार आहे. शहरात पालखी सोहळ्याचे सकाळी १० वाजता बुलढाणा रोडवरील ब्राह्मण सभा मंगल कार्यालय येथे भव्य स्वागत करण्यात येणार आहे. यानंतर संत मुक्ताबाईंच्या पालखीची शहरातील प्रमुख मार्गांवरून टाळ-मृदंगाच्या गजरात,

असून तेथे पालखीचा मुक्काम राहणार आहे. १७ ऑगस्ट रोजी संत मुक्ताबाईंची पालखी मलकापुरहून मुक्ताईनगरच्या दिशेने स्वगृही परतीच्या प्रवासाला निघणार आहे.

सोहळ्याचे ह.भ.प. रविंद्र महाराज हरणे यांनी दिली. संत मुक्ताबाईंच्या पालखी सोहळ्याच्या मलकापुरातील स्वागतासाठी परिसरातील सर्व वारकरी, भाविक व भक्तगणांनी मोठ्या

# खचलेल्या रस्त्यांची दुरुस्ती करण्याची मागणी

प्रतिनिधी १२ ऑगस्ट

**खामगाव** : जिल्ह्यातील बहुतांश भागात ३० व ३१ जुलै रोजी झालेल्या जोरदार पावसामुळे तालुक्यातही रस्ते खचले आहेत. काही रस्त्यांच्या कडेला भेगा पडल्या असून, काही ठिकाणी खड्डे निर्माण झाल्याने वाहतुकीस धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे संबंधित विभागाने खचलेल्या रस्त्यांची तातडीने दुरुस्ती करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. जोरदार पावसामुळे ग्रामीण तसेच मुख्य मार्गावरील रस्त्यांची मोठ्या प्रमाणात झीज झाली आहे. काही ठिकाणी रस्त्याच्या कडेला असलेली माती वाहून गेल्याने रस्ता अरुंद झाला आहे. रात्रीच्या वेळी खचलेले भाग आणि खड्डे वाहनचालकांच्या लक्षात न आल्यास अपघात होण्याची शक्यता आहे. पावसाळ्यात ग्रामीण भागातील अनेक रस्त्यांवरून शेतकरी, विद्यार्थी तसेच नागरिकांची नियमित ये-जा सुरू असते.

# राजीनाम्यासाठी 3 वर्षे त्रास; वैभव वर्गे यांच्यावर तामगाव पोलिसांत गुन्हा दाखल

प्रतिनिधी १२ ऑगस्ट

**संग्रामपूर** : संग्रामपूर तालुक्यातील आदर्श खासदार ग्राम करमोडा येथील लोकनियुक्त सरपंच दीपक प्रकाश उगले वय ४६ यांनी ११ ऑगस्टच्या पहाटे लोहगाव शिवारातील शेतात गळफास लावून आत्महत्या केली. आत्महत्येपूर्वी व्हॉट्सअ‍ॅपवर टाकलेल्या व्हिडिओमध्ये त्यांनी गावातील एका व्यक्तीच्या सततच्या त्रासाला कंटाळल्याचे सांगितले होते. मृतकाच्या भावाच्या फिर्यादीवरून तामगाव पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. मृतकाचे भाऊ श्रीकृष्ण प्रकाश उगले वय ४०, रा. करमोडा यांनी दिलेल्या तक्रारीवरून तामगाव पोलीस ठाण्यात कलम १०८, ३५१(३) क्वहस् २०२३* प्रमाणे गुन्हा नोंदवण्यात आला आहे. फिर्यादीत आरोप आहे की, यातील आरोपी वैभव उर्फ भैय्या वर्गे हा गेल्या ३ वर्षांपासून "सरपंच पदाचा राजीनामा दे, मला सरपंच व्हायचे आहे" म्हणून फोनवरून आणि प्रत्यक्ष भेटून मानसिक त्रास देत होता. तसेच "कुटुंबासह संपवून टाकेन" अशी जीवे मारण्याची धमकीही देत होता. तो दारू पिऊन दररोज त्रास देतो. जामीनावर सुटल्यास आमच्या कुटुंबाला धोका आहे." "माझा व्हिडिओ पाहिल्यानंतर पोलिसांनी आरोपीला तातडीने अटक करावी आणि माझा अंत्यविधी शांततेत पार पडावा" अशी मागणी त्यांनी केली. केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव आणि आमदार संजय कुटे यांनाही त्यांनी न्याय मिळवून देण्याचे आवाहन केले आहे. घटनेची माहिती मिळताच तामगाव पोलिसांनी घटनास्थळी पंचनामा केला. मृतदेह शवविच्छेदनासाठी वरवट बकाल येथे पाठवण्यात आला. या प्रकरणाचा पुढील तपास पोउपनि. गजानन शिंदे यांच्याकडे आहे. पोलिसांकडून आरोपीचा शोध सुरू आहे. या घटनेमुळे करमोडा गावासह संपूर्ण तालुक्यात हळहळ व्यक्त होत आहे. आमदार डॉ संजय कुटे यांची भेट..... करमोडा येथील सरपंच यांनी आत्महत्या केल्याची माहिती मिळताच आमदार डॉ संजय कुटे व भाजपा तालुका अध्यक्ष भाऊरावं अवचार यांनी वरवट बकाल ग्रामीण रुग्णालयात जाऊन नातेवाईका सोबत चर्चा केली. पी एम

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी सायरन ऑफसेट प्रिंटर्स एमआयडीसी क्र. २ पोलिस स्टेशन समोर ता. जि. अकोला येथे मुद्रित करून सिटी न्युज सुपरफास्ट कार्यालय ख्रिस्त कॉलनी, ट्रेझरी ऑफिस नजीक, प्रफुल घवळे यांची बिल्डिंग अमरावती, C/0 गॅलक्सी बार जवळ येथे प्रकाशित केले. ■ मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख ■ संपर्क - 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/26/A2977, RRC Helpline No. 8484842135